पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/४२४/२०१८
दिनांक : ०६/०७/२०१८

प्रति,

मा......................................
सदस्य, शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा दि.१०**/०७/२०१८** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा **मंगळवार** दिनांक **१०/०७/२०१८** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा. शहर सुधारणा समिती
**कार्यपत्रिका क्रमांक - ०४**

दिनांक : १०/०७/२०१८ वेळ : दुपारी ३.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा **मंगळवार** दिनांक **१०/०७/२०१८** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

दिनांक २६/०६/२०१८ व ०२/०७/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ३) सभावृत्तांत कायम करणे.

-----------

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसूचना क्रं. टिपीएस- १८९३|१४१२|युडी- १३, दि. २८ नोव्हेंबर १९९५ अन्वये मंजुर विकास आराखड्यातील तसेच पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजुर विकास योजनेतील वगळलेल्या भागाची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांचेकडील अधिसूचना क्र.टिपीएस- १८९३|१४१२|युडी- १३, दि. २८ डिसेंबर १९९९ अन्वये मंजुर झालेली आहे. सदर विकास आराखड्यातील काही क्षेत्र महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, अधिसुचना क्र. पीसीएन- १६९७|९३४|प्र. क्रं. ८९|नवि-२२, मंत्रालय, मुंबई, दिनांक १५ नोव्हेंबर १९९७ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रण कक्षेमध्ये समाविष्ट करण्यात आलेले आहे. त्यापैकी मौजे रहाटणी येथील पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजुर विकास योजनेतील स.नं. २८ पै, २९ पै, ३७ पै, ३८ पै. मधील १२.०० मी. रुंद रस्त्याचे भूसंपादन करणे आवश्यक आहे. सदर रस्त्याची सुमारे ५८० मी. इतकी लांबी असून त्यापैकी स.नं. २८ पै, २९ पै. मधील २००.०० मी. लांबीचा रस्ता १२.०० मी. रुंदीनुसार विकसित झालेला आहे. उर्वरीत स.नं. ३७ पै. व ३८ पै. मधील रस्ता पुर्ण रुंदीचा विकसित झालेला नाही. या क्षेत्रात बांधकामे असून सदर रस्त्याच्या जागेचे भूसंपादन होणे आवश्यक आहे. तरी प्रस्तावित रस्त्याखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक

व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व नवीन भूसंपादन कायदा सन २०१३ अन्वये संपादन करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/४२४/२०१८
दिनांक : ०६/०७/२०१८ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयाचे विषयपत्र (डॉकेट्) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आले आहे.

Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 2018-19 sub committee sabhapati.doc